महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,
महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६

Email ID - dycommr.enf1@gmail.com

---

क्र.पआका/म.रा.का.१/रापप्रा बैठक २७६/२०२५/जा.क्र. 1104 दिनांक : 24 JAN 2025

प्रति,
सर्व सभासद,
राज्य परिवहन प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय:- राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २३/०१/२०२५ रोजीच्या २७६ व्या बैठकीचे इतिवृत्त

महोदय,

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २३/०१/२०२५ रोजीच्या २७६ व्या बैठकीचे मंजूर झालेले इतिवृत्त माहितीसाठी सोबत पाठवित आहे.

(भरत कळसकर)
सचिव,
राज्य परिवहन प्राधिकरण तथा,
अपर परिवहन आयुक्त,(अ.का.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:- मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग (परिवहन), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, व अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

Scanned by CamScanner

# राज्य परिवहन प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर मुख्य सचिव (परिवहन) तथा अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील कार्यालयीन दालनात दि.२३/०१/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, यांच्या २७६ व्या बैठकीचे इतिवृत्त पुढे नमुद केल्याप्रमाणे आहे:-

सदर बैठकीस राज्य परिवहन प्राधिकरणाचे पुढे नमुद केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री.संजय सेठी, भा.प्र.से.<br>अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| २. डॉ. सुरेश कुमार मेकला, भा.पो.से.<br>अपर पोलिस महासंचालक (वाहतुक),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ३. श्री. विवेक भीमनवार, भा.प्र.से.<br>परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ४. श्री. भरत कळसकर<br>अपर परिवहन आयुक्त, (अ.का.)<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सचिव,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |

बाब क्रमांक:- १

**विषय :- दिनांक २५.०७.२०२२ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २७५ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.**

दिनांक २५.०७.२०२२ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २७५ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देऊन सदर इतिवृत्त प्राधिकरणानें कायम केले.

बाब क्रमांक:- २

**विषय :- दिनांक २५.०७.२०२२ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २७५ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेण्याबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक २५.०७.२०२२ रोजी घेण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या २७५ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेतला.

Scanned by CamScanner

त्या आढावाच्या अनुषंगाने दिनांक २५.०७.२०२२ रोजीच्या बैठकिच्या इतिवृत्ता मधील बाब क्र. ०६ बाबत महाराष्ट्र-मध्यप्रदेश व महाराष्ट्र-छत्तीसगढ राज्य यांच्यामध्ये झालेल्या परस्पर वाहतूक करारांतर्गत समाविष्ट असलेल्या आंतरराज्यीय मार्गांवर टप्पा वाहतूक करण्यासाठी खाजगी वाहतूकदारांना मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ८७(१)(C) मधील तरतूदीनुसार जारी करण्यात येणाऱ्या तात्पुरत्या परवान्यांबाबत कोर्टाने दिलेल्या निर्देशाची माहिती राज्य परिवहन प्राधिकरणासमोर सादर करण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२५ ठराव क्र.०१/२०२५)**

**बाब क्रमांक :- ०३**

विषय:- **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना टप्पा वाहतूक सेवांच्या भाड्यांमध्ये आपोआप भाडेवाढीच्या सुत्रानुसार प्रति टप्पा दरवाढ व ठोक भाडे पध्दतीने प्रवासभाडे आकारणी करण्यास परवानगी मिळण्याबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

शासन निर्णय क्र.एमटीसी-१०९९/४५१/प्र.क्र.२१/परि-१ दि.१६.०४.१९९९ अन्वये आपोआप भाडेवाढ सुत्र शासनाने मान्य केले आहे. या सुत्रानुसार राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी बससेवांचे प्रवासी भाडे निश्चित करण्यात येते. यापूर्वीची भाडेवाढ दिनांक २६.१०.२०२१ पासून लागू करण्यात आली. तद्नंतर ३ वर्षात भाडेवाढ करण्यात आली नाही. चलनासाठी आवश्यक असलेल्या डिझेल, चेसीस, टायर या घटकांच्या किंमतीत बदल झाल्यामुळे तसेच महागाई भत्त्यात वाढ झाल्यामुळे आपोआप भाडेवाढ सुत्रानुसार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी दिनांक ०१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या प्रवासी भाडेदरात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रस्तावित केलेल्या टप्पा वाहतूक सेवांच्या प्रवास भाडयात वाढ करणेबाबतचा सुधारीत प्रस्तावातील प्रती टप्पा अंतिम आकारणी दराबाबत (५ रुपये पटीत) सखोल चर्चा केली.

हकिम समितीच्या सुत्रानुसार प्रति टप्पा प्रवासी भाडेदर व अपघात सहाय्यता निधी प्रति प्रवासी रु.१/- धरुन पुढील प्रमाणे प्रथम टप्यात किमान दर (१ रुपये पटीत) आकारणी करण्यास राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिली.

| अ.क्र. | सेवेचा प्रकार | सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. (रुपये) | ०६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर (रुपये) | प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर [(अपघात निधीसह) (१ रुपये पटीत)] रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | साधी बस | ८.७० | १०.०५ | ११.०० |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | जलद सेवा (साधारण) | ८.७० | १०.०५ | ११.०० |
| ३ | रात्र सेवा (साधारण बस) | ८.७० | १०.०५ | ११.०० |
| ४ | निम आराम | ११.८५ | १३.६५ | १५.०० |
| ५ | विनावातानुकूलीत शयन आसनी | ११.८५ | १३.६५ | १५.०० |
| ६ | विनावातानुकूलीत शयनयान | ११.८५ | १४.७५ | १६.०० |
| ७ | शिवशाही (वातानुकूलीत) | १२.३५ | १४.२० | १६.०० |
| ८ | जनशिवनेरी (वातानुकूलीत) | १२.९५ | १४.९० | १७.०० |
| ९ | शिवशाही स्लिपर(वातानुकूलीत) | १३.३५ | १५.३५ | १७.०० |
| १० | शिवनेरी (वातानुकूलीत) | १८.५० | २१.२५ | २३.०० |
| ११ | शिवनेरी स्लिपर (वातानुकूलीत) | २२.०० | २५.३५ | २८.०० |
| १२ | ई बस ०९ मिटर (वातानुकूलीत) | १२.०० | १३.८० | १५.०० |
| १३ | ई-शिवाई / ई बस १२ मिटर (वातानुकूलीत) | १३.२० | १५.१५ | १७.०० |

तसेच, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी खालील नमूद "अ" "ब" व "क" अजिंठा टी जंक्शन ते अजिंठा लेणी, कर्जत-नेरळ-माथेरान व महाबळेश्वर, प्रतापगड दर्शन मार्गांचे टोक भाडे पध्दतीने प्रवासभाडे आकारणी करण्यासाठी राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिली.

अ)

| मार्ग | अंतर | सेवा प्रकार | सध्याचे टोक भाडे (रु.५/-च्या पटीत) आरक्षण आकार सहित | प्रस्तावित टोक भाडे (रु.५/-च्या पटीत) आरक्षण आकार सहित |
|---|---|---|---|---|
| अजिंठा टी जंक्शन ते अजिंठा लेणी | ४.३ | वातानुकुलीत शिवनेरी बस | ३०.०० | २५.०० + १०.०० + १.०० = ३६.०० (आकारणीय ३५.००) |
| | | वातानुकुलीत (शिवशाही बस) | २५.०० | १५.०० + १०.०० + १.०० = २६.०० (आकारणीय २५.००) |
| | | साधी बस | १५.०० | १०.०० + ५.०० +१.०० = १६.०० (आकारणीय १५.००) |



Scanned by CamScanner

व)

| मार्ग | अंतर | सध्याचे प्रवास भाडे | | प्रस्तावित भाडे | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले |
| कर्जत - माथेरान | २६.१ | ४० | २० | ८५ | २५ |
| कर्जत - नेरळ | १६.९ | २५ | १५ | ३० | १५ |
| नेरळ - माथेरान | ९.२ | २५ | १५ | ३० | १५ |

क)

| मार्ग | अंतर | आकारणीय टप्पे | कि.मी. प्रमाणे प्रवासभाडे | | प्रस्तावित टोक भाडे (आरक्षण आकारासह) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले |
| महाबळेश्वर दर्शन | ४०.० | ०७ | ७० | ३५ | ११० | ६० |
| प्रतापगड दर्शन | ४३.० | ०८ | ८० | ४० | १२५ | ६५ |
| महाबळेश्वर - प्रतापगड दर्शन | ८३.० | १४ | १४० | ७० | २२५ | ११० |

सदर भाडेवाढ दिनांक २५.०१.२०२५ (दिनांक २४.०१.२०२५ च्या मध्यरात्रीनंतर ) पासून अंमलात येईल असे निर्देश प्राधिकरणाने दिले.

(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२५ ठराव क्र.०२/२०२५)

**बाब क्रमांक :- ०४**

**विषय:- मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट ए कॅब स्किम १९८९ अंतर्गत मोटार कॅब्स भाडयाने देण्यासाठी मुख्य व शाखा कार्यालयाचे लायसेन्सचे नुतनीकरण करणे, पत्ता बदल करणे व नवीन लायसन्स जारी करणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले.

राज्य परिवहन प्राधिकरण महाराष्ट्र यांनी वाहन भाडयाने घेणाऱ्या व्यक्तींची ओळख तपासण्याची पुर्ण जबाबदारी रेंट-ए-कॅब योजनेअंतर्गत मंजुर लायसन्स धारकाची राहिल या अटीवर पुढील प्रमाणे मुख्य व शाखा कार्यालयाचे रेन्ट-ए-कॅब लायसेन्सचे नुतनीकरण करणे, पत्ता बदल करणे व नवीन लायसन्स जारी करण्यास मान्यता दिली.

१) मे. प्राईम मुव्हर मोबॅलिटी टेक्नोलॉजी प्रा. लि., सांताक्रुज (पूर्व), मुंबई यांचे शाखा कार्यालयाचे रेंट-ए-कॅब लायसन्स क्र. 17/RENT-A-CAB/LICENCE/STA/2017 वैधता पुढील पाच वर्षाकरिता (मुख्य लायसन्सच्या वैधतेपर्यंत) नुतनीकरण व लायसन्स वरील पत्ता बदल करण्यास करण्यास मान्यता दिली.



Scanned by CamScanner

२) मे. जाल ऑटो हायर्स यांचे रेन्ट-ए-कॅब लायसन्स क्र. 8/RENT-A-CAB/LICENCE/STA/2002 पुढील ५ वर्षाकरीता नुतनिकरण करण्यास मान्यता दिली.

३) मे. मर्क्युरी कार रेन्टल्स प्रा.लि. यांचे शाखा कार्यालयाचे रेंट-ए-कॅब लायसन्स क्र. 02/Rent-A-Cab/STA/2001 ची वैधता पुढील पाच वर्षाकरिता (मुख्य लायसन्सच्या वैधतेपर्यंत) नुतनीकरण करण्यास मान्यता दिली.

४) मे. बर्ग्रुयन कार रेंटल्स प्रा.लि.मुंबई यांचे शाखा कार्यालयाचे रेंट-ए-कॅब लायसन्स क्र. ११ रेंट-ए-कॅब/एसटीए/लायसन्स/२००९ वैधता पुढील पाच वर्षाकरिता(मुख्य लायसन्सच्या वैधतेपर्यंत) नुतनीकरण करण्यास मान्यता दिली.

५) रेन्ट-ए-कॅब लायसन्स क्र. 07/RENT-A-CAB/LICENCE/STA/2000 पुढील ५ वर्षाकरीता नुतनिकरण करण्यास मान्याती दिली. व रेन्ट-ए-कॅब लायसन्स मध्ये " मे. ओरीक्स ऑटो इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिस लि. " ऐवजी "मे. ओरीक्स कॉर्पोरेशन इंडिया लि. ",असा नावात बदल केलेल्या प्रस्तावात नोंद घेतली.

६) मे. युरो कार्स इंडिया प्रा.लि. बि-१३१२, कोहीनूर स्केअर, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८ यांना मुख्य कार्यालयाचे नवीन रेंट-ए-कॅब लायसन्स पुढील पाच वर्षाकरीता जारी करण्यास मान्यता दिली.

(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२५ ठराव क्र.०३/२०२५)

**बाब क्रमांक :- ५**

**विषय :-** **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पर्यावरणपुरक नविन बीएस ६ मानकाच्या नविन साध्या बसेस टोमॅटो लाल रंगसंगतीस मान्यता मिळणेबाबत केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दिनांक ११.०५.२०१५ रोजीच्या २५४ व्या बैठकित ठराव क्र. १०/२०१५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या रंगसंगती बाबत सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन केले व केलेल्या कार्यवाहीस मंजुरी दिली.

(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२५ ठराव क्र.०४/२०२५)

**बाब क्रमांक :- ६**

**विषय :-** **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विद्युत प्रणालीवर चालणाऱ्या बसेसच्या रंगसंगतीस मान्यता मिळणेबाबत केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले.



Scanned by CamScanner

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दिनांक ११.०५.२०१५ रोजीच्या २५४ व्या बैठकित ठराव क्र. १०/२०१५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या रंगसंगती बाबत सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन केले व केलेल्या कार्यवाहीस मंजुरी दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२५ ठराव क्र.०५/२०२५)**

**बाब क्रमांक :- ७**

**विषय :- मोटार वाहन अधिनियम १९८८ चा कलम ८२ च्या तरतुदीनुसार कंत्राटी परवाना हस्तांतरण करणेबाबत.:- अर्जदार श्री. धनंजय रामराव इंगोलो**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

परवानाधारक श्री. रामराव मोतीरामजी इंगोले यांचे दिनांक १२.१२.२०२१ रोजी निधन झाले आहे.

परवानाधारक श्री. रामराव मोतीरामजी इंगोले यांच्या निधनानंतर त्यांच्या नावे असलेला अखिल महाराष्ट्र वातानुकुलीत स्लिपर कंत्राटी बस परवाना क्र. ७७५/STA/AC SLEEPER/BUS/२०१२ परवानाधारकाचा वारसदार मुलगा म्हणून आपल्या नावे हस्तांतरण करण्यास अर्जदार श्री. धनंजय रामराव इंगोलो यांनी विनंती केली.

राज्य परिवहन प्राधिकरणाने उपरोक्त सर्व बाबींची व विषयसूचीमधील सर्व वस्तुस्थितीची नोंद घेऊन अखिल महाराष्ट्र वातानुकुलीत स्लिपर कंत्राटी बस परवाना क्र. ७७५/STA/AC SLEEPER/BUS/२०१२ परवानाधारकाचा वारसदार मुलगा श्री. धनंजय रामराव इंगोलो यांच्या नावे हस्तांतरण करण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२३ ठराव क्र.०६/२०२३)**

**बाब क्रमांक :- ८**

**विषय :- महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम ८८ मधील तरतूदीनुसार स्थायी टप्पा वाहतुक परवान्यामध्ये समाविष्ट असलेल्या वाहनाच्या जागी दुसरे वाहन बदली सादर करणेबाबत :- अर्जदार श्री. मुफादल जुजेर अमीन**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

आंतरराज्यीय मार्गावर टप्पा वाहतूक करण्यासाठी जारी करण्यात आलेल्या स्थायी टप्पा परवाना क्र. १५३१/STA/STAGE/२०१४ वर दुसरे बदली वाहन सादर करण्यास परवानाधारक श्री. मुफादल जुजेर अमीन यांना ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२३ ठराव क्र.०७/२०२३)**



Scanned by CamScanner

बाब क्रमांक :- ९

विषय :- महाराष्ट्र मोटार वाहन नियम ६४ मधील तरतुदी नुसार मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट-ए-कॅब स्किम १९८९ अंतर्गत मोटार कॅब्स भाडयाने देण्यासाठी जारी करण्यात आलेल्या मुख्य व शाखा कार्यालयाचे रेन्ट-ए-कॅब लायसन्सचे नुतनिकरण कामकाजा संदर्भात सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण यांना अधिकार प्रत्यर्पित (Deligate) करण्याबाबत

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

सदर विषयांकित बाबीवर सखोल चर्चा केली. राज्य परिवहन प्राधिकरणाची बैठक पुढील ३ महिन्यात संपन्न न झाल्यास मुख्य कार्यालय तसेच शाखा कार्यालयाचे रेन्ट-ए-कॅब लायसन्सचे नुतनिकरणाची प्रकरणे राज्य परिवहन प्राधिकरणाकडे परिचलन पध्दतीने सादर करण्यास राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिली.

(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २३/०१/२०२३ ठराव क्र.०८/२०२३)

श्री. भरत कळसकर
सचिव,
राज्य परिवहन प्राधिकरण
तथा अपर परिवहन आयुक्त,(अ.का.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

श्री. विवेक भीमनवार,(भा.प्र.से)
सदस्य,
राज्य परिवहन प्राधिकरण,
तथा परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

डॉ. सुरेश कुमार मेकला, (भा.पो.से.)
सदस्य,
राज्य परिवहन प्राधिकरण
तथा अपर पोलीस महासंचालक(वाहतूक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

श्री.संजय सेठी,(भा.प्र.से)
अध्यक्ष,
राज्य परिवहन प्राधिकरण,
तथा अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned by CamScanner